RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक २८] शुक्रवार, मार्च ४, २०२२/फाल्गुन १३, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ७४**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृहनिर्माण विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ०४ मार्च, २०२२

**नोटीस**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१.**

क्रमांक भूसंपा-२०२१/प्र.क्र.४८/झोपनि-२.—ज्याअर्थी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण वांद्रे, मुंबई यांच्या अभिवेदनावरून महाराष्ट्र शासनास असे दिसून आले आहे की, उक्त प्राधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अनुसूची" असा करण्यात आला आहे.) नमूद केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणे शक्य व्हावे म्हणून उक्त अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) संपादित करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ (महा.१९७१ चा २८) च्या प्रकरण I-A च्या कलम ३ (D) (c) (i) च्या परिच्छेद (A) अन्वये सुधारणा करण्यात आलेल्या प्रकरण पाच मधील कलम १४ च्या पोट-कलम (१) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा, मुंबई यांनी बजावलेल्या त्यांच्या क्र.झोपुप्रा/उजि/भूसंपादन/मंगलमूर्ती/२०२०/DYCOL/OW/२०२०/४५७६, दिनांक २८ जानेवारी, २०२० तसेच "महाराष्ट्र टाईम्स' या मराठी वृत्तपत्रात व "द फ्री प्रेस जर्नल" या इंग्रजी वृत्तपत्रात दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येऊन आणि उक्त अधिनियमांच्या कलम ३६ अन्वये, सदर क्षेत्रात सर्वांना ठळकपणे दिसेल अशा ठिकाणी चिकटवून, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (६) मध्ये नमूद केलेल्या ज्या व्यक्ती, उक्त जमीनीचे मालक आहेत वा हितसंबंधीय आहेत, अशा व्यक्तींना उक्त जमीन संपादित करण्यासाठी शासनास प्रस्ताव का सादर करण्यात येऊ नये, याबाबत उपरोक्त नोटीस मिळाल्यापासून वा वृत्तपत्रात नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या कालावधीत कारणे दाखल करण्याबाबत फर्मावले होते;

आणि ज्याअर्थी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारी यांना यासंदर्भात उक्त जमीन संपादित करण्याच्या अनुषंगाने झोपडीधारकांची संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था, जमिनीचे मालक अथवा अन्य हितसंबंधीत यांचेकडून कोणत्याही हरकती प्राप्त झालेल्या नाहीत;

आणि ज्याअर्थी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारी यांनी झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचा अर्ज, अधिकार अभिलेखांतील नोंदी, उक्त जमिनीवर विकास आराखड्यानुसार असलेले आरक्षण तसेच संबंधित झोपडीधारकांनी सादर केलेली न्याय मागणी विचारात घेऊन उक्त जमीन संपादनाबाबतचे अभिवेदन राज्य शासनास दिनांक २८ मे, २०२१ रोजी सादर केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या प्रकरण I-Aच्या कलम ३ (D) (c) (i) च्या परिच्छेद (A) अन्वये सुधारणा करण्यात आलेल्या प्रकरण पाच मधील कलम १४ च्या पोट-कलम (१) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी सादर केलेले अभिवेदन व त्यांनी या प्रकरणी सादर केलेला अहवाल विचारात घेऊन राज्य शासनास उक्त अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राच्या विकासासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकास करणे शक्य व्हावे म्हणून उक्त जमीन संपादित करणे आवश्यक असल्याचे दिसून आले आहे.

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या प्रकरण I-Aच्या कलम ३ (D) (c) (i) च्या परिच्छेद (A) अन्वये सुधारणा करण्यात आलेल्या प्रकरण पाच मधील कलम १४ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन या नोटिशीद्वारे असे घोषित करीत आहे की त्याने उक्त जमीन संपादित करण्याचे ठरविले आहे.

**अनुसूची**

| जिल्हा | तालुका | गाव | नगर भूमापन क्रमांक | संपादित करावयाच्या जमिनीचे अंदाजित क्षेत्र चौ.मी. मध्ये | जमीन मालक व इतर धारकांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मुंबई उपनगर | कुर्ला | मौजे बोर्ला | ४०९/१२ अ | ९०.२ | धारक -<br>रस्ता H<br>शशिकांत नारायण आचार्य |
| | | | ४१४ पैकी | १८०.३ | मूळधारक शेतीकडे<br>(मिळकत पत्रिकेप्रमाणे)<br>१. इंदिराबाई महादेव पाटील<br>२. धनुर्धरी महादेव पाटील<br>३. श्री. प्रफुल महादेव पाटील (वरील कबजेदार ७/१२ प्रमाणे) |
| | | | एकूण | २७०.५ | |

**सीमा**

| न.भू.क्र. | पूर्व | पश्चिम | उत्तर | दक्षिण |
|---|---|---|---|---|
| मौजे बोर्ला ता.कुर्ला ४०९/१२ अ, ४१४ | न. भू. क्र. ४१७, ४१६ व शिवसाई सह.गृह. संस्था | न. भू. क्र. ४५३, ५२५, ५२६ व पवनपुत्र सह.गृह.संस्था | न. भू. क्र. ४१४, ४०९ड | न. भू. क्र. ४१५/८७, ४५१ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**सु. बा. तुंबारे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 4th March, 2022

*NOTICE*

MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.

No. Bhusampa-2021/C.R.48/Zopani-2.—Whereas, on representation from the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, Bandra, Mumbai, it appears to the Government of Maharashtra that in order to enable the said Authority to implement the Slum Rehabilitation Scheme in relation to the Slum Rehabilitation Area mentioned in the Schedule appended hereto (hereinafter referred to as "the said Schedule"), it is necessary that the land specified in the said Schedule (hereinafter referred to as "the said land"), should be acquired ;

And whereas, as required by the proviso to sub-section (*1*) of section 14 of Chapter V read with paragraph (A) of sub-clause (*i*) of clause (c) of section 3D of Chapter I-A of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 (Mah.XXVIII of 1971) (hereinafter referred to as "the said Act"), the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, Bandra, Mumbai, has by his notice No. SRA/Dy.Coll./LA/Mangalmurti/2020/Dy.Coll./ow/2020/4576, dated the 28th January 2020, served in prescribed manner and also by notice published in the daily Marathi newspaper "Maharashtra Times" and English newspaper "The Free Press Journal" dated the 30th January 2020, and also by affixing on the conspicuous part in the premises situated in the said land, as provided in section 36 of the said Act, called upon the persons mentioned in column (6) of the said Schedule, who are the owners of the said land or any other person interested therein to show cause, within fifteen days from the date of its publication in the newspapers, as to why the proposal to acquire the said land for implementation of the Slum Rehabilitation Scheme for the concerned slum dwellers should not be sent to the State Government for approval ;

And whereas, the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, Bandra, Mumbai has not received any objections from the concerned Co-operative Housing Society of the slum dwellers and the owners of the said land or any other person interested therein;

And whereas, the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, Bandra, Mumbai after considering the application of the proposed Co-operative Housing Society of the slum dwellers, entries as to the rights in the land record, reservation in the development plan and the legitimate request of the slum dwellers has by his representation dated the 28th May 2021, submitted the report to the State Government for the acquisition of the said land ;

And whereas, as required by the first proviso to sub-section (*1*) of section 14 of Chapter V read with paragraph (A) of sub-clause (*i*) of clause (*c*) of section 3D of Chapter I-A of the said Act, on representation received from the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, Bandra, Mumbai, and after considering his report it appears to the State Government that in order to enable the Slum Rehabilitation Authority to carry out the development under the Slum Rehabilitation Scheme in the Slum Rehabilitation Area mentioned in the said Schedule, the said land should be acquired ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 14 read with paragraph (A) of sub-clause (*i*) of clause (c) of section 3D of Chapter I-A of the said Act, the Government of Maharashtra hereby declares by this notice that, it has decided to acquire the said land.

*Schedule*

| District | Taluka | Village | C.T.S. No. | Approximate area of the land decided to be acquired (in sq. Meters) | Name of the owners or other intrested person of the land decided to be acquired |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| Mumbai Suburban | Kurla | Village Borla | 409/12A | 90.2 | **Dharak** Road H Shashikant Narayan Acharya |
| | | | 414 (pt) | 180.3 | **Agriculture** (As per PR Card) 1. Indirabai Mahadev Patil 2. Dhanurdhari Mahadev Patil 3. Praful Mahadev Patil (As per 7/12) |
| | | | **Total** | **270.5** | |

*BOUNDARIES*

| C.T.S. No. | On the East by | On the West by | On the North by | On the South by |
|---|---|---|---|---|
| Village Borla Taluka Kurla, 409/12A, 414 | C.T.S.No. 417, 416 and Shivsai CHS | C.T.S.No. 453, 525, 526 and Pawanputra CHS | C.T.S.No. 414, 409 D | C.T.S.No. 415/87 451 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. B. TUMBARE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.